अतिवृष्टीग्रस्त जिल्हयामध्ये नंदुरबारचा समावेश करा

खा.गोवाल पाडवी यांची मागणी

■ नवापूर । दि.१५। श.प्र. -

नंदुरबार जिल्ह्याचे नाव अतिवृष्टीग्रस्त जिल्ह्यांमध्ये समाविष्ट करून शेतकऱ्यांना तत्काळ नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी खा.ॲड.गोवाल पाडवी यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये मुसळधार पावसामुळे कापूस, उडीद, मूग, तूर, सोयाबीन, भात यांसारख्या प्रमुख पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या घरांची व जनावरांच्या गोठ्यांची हानी झाली असून, या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांसह मजुरांनाही मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नंदुरबार हा आदिवासी बहुल जिल्हा असल्याने येथील शेतकरी आधीच आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत. अतिवृष्टीमुळे त्यांच्या संकटात अधिक भर पडली आहे. त्यामुळे राज्य सरकारने नंदुरबार जिल्ह्याचाही समावेश अतिवृष्टीग्रस्त जिल्ह्यांमध्ये करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी केली आहे.

तळोदा तालुक्यातून दररोज होतेय शेकडो मजुरांचे स्थलांतर

जिल्हयात रोजगाराचा प्रश्न गंभीर असल्याने पोटाची खळगी भरण्यासाठी गुजरात राज्यात स्थलांतर

मंगेश पाटील

■ बोरद । दि.१५।

यंदा पावसाचे प्रमाण चांगले असूनही, तळोदा तालुक्यातील ग्रामीण भागातील, विशेषतः पश्चिम भागातील आदिवासी बांधवांनी मोठ्या संख्येने गुजरात राज्याकडे रोजगारासाठी स्थलांतर सुरू केले आहे. केवळ पंधरा दिवसांत हजारो मजुरांनी आपल्या कुटुंबासह गावाला तात्पुरता निरोप दिला आहे. त्यामुळे बोरद, मोड, मालदा, छोटा धनपूर, कढेल, तुळाजा, खरवड, बन, लाखापूर यांसारखी गावे ओसाड पडू लागली आहेत.

जिल्ह्यात रोजगाराचा प्रश्न गंभीर असल्याने मजुरांना पोटासाठी स्थलांतर करणे भाग पडत आहे. तळोदा परिसरात शेतीची फारशी कामे उपलब्ध नाहीत. गुजरात राज्यातील सौराष्ट्र भागात मजुरांना स्थानिक मजुरीपेक्षा दुप्पट ते अडीचपट अधिक रोजंदारी मिळत आहे.

बोरद येथील मजूर नितीन पाडवी यांच्या म्हणण्यानुसार स्थानिक रोजंदारी २०० रुपये प्रतिदिन, गुजरात (सौराष्ट्र) रोजंदारी- ४५० ते ५०० प्रतिदिन मिळते. याशिवाय, गुजरातमध्ये शेतमालकांकडून तीन वेळा चहा आणि जेवणाची व्यवस्था केली जाते. यामुळे मजुरांचा मोठा खर्च वाचतो. पुरेशा प्रमाणात काम उपलब्ध होत असल्याने मजूर कुटुंबासह लक्झरी बसने गुजरातच्या विविध भागांत रवाना होत आहेत.

या स्थलांतरामुळे कुटुंबासोबत जाणाऱ्या मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शाळा सोडून स्थलांतरित झाल्यामुळे परत आल्यावर त्यांना पुन्हा शिक्षणाची गोडी लागण्यास वेळ लागतो. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीकडे शासनाने तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे, अशी मागणी होत आहे.

बोरद येथील मजूर ठेकेदार मच्छिंद्र ढोडरे यांनी सांगितले की, दररोज परिसरातील शेकडो मजूर त्यांना गुजरातला जाण्यासाठी भेटत आहेत. गुजरातच्या शेतकऱ्यांशी वैयक्तिक संबंध असल्याने ते मजुरांना योग्य रोजंदारी मिळेल या उद्देशाने त्यांना रवाना करत आहेत.

एका अंदाजानुसार, दिवसाला सुमारे ४०० ते ५०० मजूर गुजरातच्या दिशेने रवाना होत आहेत. या परिस्थितीमुळे जिल्ह्यातील रोजगाराचा प्रश्न पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. मजुरांनी व्यक्त केले आहे की, जिल्ह्यामध्येच त्यांना गुजरातप्रमाणे योग्य रोजंदारी आणि काम उपलब्ध झाले, तर त्यांना स्थलांतर करण्याची गरज पडणार नाही. त्यामुळे शासनाने स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीसाठी ठोस उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

'एक हात मदतीचा' आवाहनाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

■ नंदुरबार । प्रतिनिधी

राज्यातील अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या पार्श्वभूमीवर, शासनाच्या जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्षाने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी केलेल्या एक हात मदतीचा या आवाहनाला जिल्ह्यामध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्षाचे अध्यक्ष डॉ. तुषार धामणे यांनी दिली.

या अभियानांतर्गत आज रोजी माय चाईल्ड पब्लिक स्कूल, नंदुरबार यांच्यातर्फे रुपये २३ हजाराचा धनादेश जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्यामार्फत मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास सुपूर्द करण्यात आला आहे.

यापूर्वीही जिल्ह्यातील अनेक दानशूर व्यक्ती व संस्थांनी या मदतकार्याला हातभार लावला आहे. आजपर्यंत मदत करणाऱ्यांमध्ये पुढील व्यक्ती आणि संस्थांचा समावेश आहे:

सतिश नारायण काशीद (५ हजार रुपये), जिल्हा परिषद केंद्र शाळा परीवर्धे, ता. शहादा (रुपये ५ हजार १६२), गजानन फायबर प्रा.लि. तर्फे अशोक चौधरी (रुपये २५ हजार), नारायण कोटेक्स प्रा.लि. तर्फे गिरीश अग्रवाल (रुपये २५ हजार), नमन कॉटन तर्फे मनिष अग्रवाल (रुपये २५ हजार), जितेंद्र मदनलाल जैन कापड व्यापारी नंदुरबार (रुपये ५ हजार १००).

या सर्व दानशूर व्यक्ती व संस्थांचे जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्षाचे अध्यक्ष डॉ. धामणे यांनी आभार मानले असून ही दिलेली मदत पुरग्रस्त बाधितांपर्यंत पोहोचवण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष कटीबद्ध आहे, असेही त्यांनी कळविले आहे.

थेवापाणी जि.प.शाळेत जागतिक हात धुवा दिन साजरा

■ नंदुरबार । दि.१५। प्रतिनिधी

थेवापाणी जि.प.शाळेत जागतिक हात धुवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व रुजावे, आरोग्याविषयी सकारात्मक सवयी विकसित व्हाव्यात आणि स्वच्छ भारत मिशनला शालेय पातळीवर पाठबळ मिळावे, या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात आले. शाळेच्या शिक्षिका श्रीमती स्नेहल गुगळे यांनी हात स्वच्छ न धुतल्यामुळे टायफॉईड, डायरिया, कॉलरा, फ्लू यांसारख्या घातक आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे स्वच्छ हात म्हणजे आरोग्याची पहिली पायरी आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना दररोजच्या जीवनात स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या जीवनशैलीत आरोग्यदायी सवयींचा समावेश होणे आवश्यक असल्याचे ठामपणे नमूद केले.

यानंतर, विद्यार्थ्यांना शाळेच्या पटांगणात नेऊन हात धुण्याच्या शास्त्रीय पद्धतीचे प्रात्यक्षिक देखील घेण्यात आले. श्रीमती गुगळे यांनी सात टप्प्यांतील योग्य हात धुण्याची प्रक्रिया, हात धुण्याची योग्य वेळ, आणि वापरायचे साहित्य साबण, स्वच्छ पाणी किंवा राख यांची माहिती विद्यार्थ्यांना सुलभ भाषेत समजावून दिली. त्यांच्या मार्गदर्शनानंतर प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून हात धुण्याचा सराव केला.

कार्यक्रमात युवा प्रशिक्षणार्थी मानसिंग ठाकरे यांनी स्थानिक बोलीभाषेतून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी हात धुण्याची वेळ (जेवणापूर्वी, शौचालयानंतर, बाहेरून आल्यावर इत्यादी) आणि वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शांताराम वळवी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना दररोज स्वच्छतेचे पालन करण्याचा सल्ला दिला व पालकांनीही घरी ही सवय बळकट करावी, असे आवाहन केले.

मुख्याध्यापक चंद्रकांत सपकाळे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छ हात, आरोग्यदायी जीवन हे घोषवाक्य देत शपथ दिली. यावेळी हात धुण्याच्या चित्रे व पोस्टर रंगविण्याच्या स्पर्धा देखील आयोजित करण्यात आल्या, ज्यामध्ये सर्वच विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने व कल्पकतेने सहभाग घेतला. परिसरातील पालकांनी या उपक्रमाचे कौतूक केले.

राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेसाठी आज निवड चाचणी

■ नंदुरबार । प्रतिनिधी

येथील एस.ए.मिशन हायस्कूल येथे उद्या दि.१७ रोजी रोजी सायंकाळी ५ वाजता ५२ वी राज्यस्तरीय ज्यूदो ज्युनियर्स स्पर्धेसाठी जिल्हा संघ निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य ज्यूदो असोसिएशन व जळगाव जिल्हा हौशी ज्यूदो संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने ५२ वी राज्य ज्यूदो ज्युनियर्स स्पर्धा व राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन दिनांक ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान जळगाव येथे करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा संघाची निवड करण्यात येणार आहे. इच्छुक खेळाडू मुला/मुलींनी या निवड चाचणी स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन नंदुरबार जिल्हा ज्यूदो असोसिएशनचे अध्यक्ष गणेश मराठे यांनी केले आहे. या स्पर्धेतील विजयी झालेल्या खेळाडूंना दि.२७ ते ३० नोव्हेंबर रोजी कोलकाता येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत खेळण्याची संधी मिळणार आहे.

नंदुरबारात वृत्तपत्र विक्रेता दिवस साजरा

■ नंदुरबार । प्रतिनिधी

येथील मध्यवर्ती बसस्थानकावर आज पहाटे साडेपाच वाजता महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र वितरण संघटना संलग्न नंदुरबार शहर वृत्तपत्र विक्रेता संघटनेतर्फे राष्ट्रीय वृत्तपत्र विक्रेता दिवस साजरा करण्यात आला. यावेळी सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. वाचन प्रेरणा दिवस आणि माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पार्पण करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उद्योजक नितेश अग्रवाल, ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर भावसार, नंदुरबार आगाराचे सहाय्यक वाहतूक निरीक्षक सोनू गिरासे, सहकार भारतीचे नंदुरबार जिल्हा संघटनमंत्री महादू हिरणवाळे उपस्थित होते. ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर भावसार यांनी वृत्तपत्र वाचन प्रत्येकाच्या जीवनात आवश्यक असल्याचे नमूद केले. सोनू गिरासे यांनी वृत्तपत्र विक्रेते आणि एसटी यांचे जिव्हाळ्याचे नाते असल्याचे सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन राज्य कार्यकारणी सदस्य व जिल्हा सल्लागार उमेशचंद्र वाणी यांनी केले. आभार शहराध्यक्ष किशोर देसाई यांनी मानले.

वृत्तपत्र विक्रेता व वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमास ज्येष्ठ सदस्य लक्ष्मण वाणी, नासिर खान, प्रकाश कुलकर्णी, योगेश पंडित, प्रसाद माळी, नितीन वसईकर, राजेश काशीद, निलेश काशीद, रफिक खान, सुनील माळी, भावेश राजपूत, प्रवीण मोरे, तपेश वाणी,मनीष कुलकर्णी, आकाश मोरे,प्रकाश शिराळकर, महेश भागवत, प्रशांत भालेराव, आदी उपस्थित होते.

केंद्रीय युवक महोत्सवात जिजामाता महाविद्यालयाचा प्रथम क्रमांक

■ नंदुरबार । प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक आयोजित केंद्रीय युवक महोत्सव २०२५ स्पर्धेत नाशिक विभागीय केन्द्र अंतर्गत जिजामाता शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा बी.ए. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी प्रणव विलास जाधव याने वाङ्:मय कला या प्रकारात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.

त्यानिमित्त या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा केंद्रप्रमुख डॉ. व्ही. आर.बोराणे, केंद्र संयोजक डॉ. अनंता बी. देशमुख, डॉ. आर जी.मेश्राम, आर.एम.शिंदे, दिलीप मराठे, प्रकाश बागुल उपस्थित होते.

जिल्हयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा, परिवर्धे जि.प.शाळेने साकारली 'वाचन कुटी'

■ नंदुरबार । दि.१५। प्रतिनिधी

जिल्हयात भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून सर्वत्र साजरी करण्यात आली. यावेळी विविध शाळांनी विविध उपक्रम राबवले.

■ **जि.प.शाळा परिवर्धे**

जिल्हा परिषद केंद्र शाळा परिवर्धे येथे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने शाळेतील परसबागेत डॉ.एपीजे अब्दुल कलाम वाचन कुटी तयार करून त्यात ४५० पुस्तकांचे ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले.शालेय जीवनात विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी यासाठी ही वाचन कुटी तयार करण्यात आली होती.

वाचन संस्कृती रुजवण्यासाठी विद्यार्थ्यांनी वाचनाकडे वळावे तसेच तरुणांनी डॉ.अब्दुल कलाम यांचे आदर्श जीवन अंगीकरावे असे मुख्याध्यापक अमृत पाटील यांनी सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांना वाचनात उपयुक्त पडतील अशी पुस्तके ग्रामस्थांनी ग्रंथालयात भेट दिली. या वाचन कुटीत विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या छान छान गोष्टींची व थोर महापुरुषांची ४५० पुस्तकांची मांडणी करण्यात आली. सूत्रसंचलन शुद्धोधन इंगळे यांनी केले. आभार उज्वला पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक अमृत पाटील, उज्वला पाटील, शुद्धोधन इंगळे, मिना गिरासे, सर्वजीत पाडवी यांनी परिश्रम घेतले.

■ **आदर्श विद्यालय, सुंदरदे**

तालुक्यातील सुंदरदे येथील आदर्श माध्यमिक माध्यमिक विद्यालयात भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक मिलिंद माळी होते. सुरुवातीला मुख्याध्यापक मिलिंद माळी यांनी डॉ.कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्याबद्दल माहिती सांगितली. डॉ.अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. वाचन ही काळाची गरज आहे, हे ओळखून सर्व विद्यार्थ्यांनी वाचनाची सवय करून घ्यावी असे आवाहनही श्री.माळी यांनी केले. सूत्रसंचलन भास्कर धनगर यांनी केले. आभार भगवानसिंग राजपूत यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जयदीप मगरे, विजय गवळी, मनोज पवार, रेखा चौधरी, नलिनी सोनवणे, गोपाल पंचभाई, राजेश त्रिवेदी, विनायक नाईक यांनी परिश्रम घेतले.

■ **जि.प.उच्च प्राथमिक शाळा खरवड**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक जयप्रकाश वाघ यांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर त्यांनी वाचन प्रेरणा दिन व वाचनाचे महत्व आपल्या भाषणातून पटवून दिले. वासुदेव पाटील यांनी मिसाईल मॅन डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा जीवन परीचय करुन देतांना त्यांचा जन्म, बालपण, शिक्षण कलामांचे संरक्षण व अंतराळ क्षेत्रातील कार्य यावर प्रकाश टाकला. त्यांचे भारताचे राष्ट्रपती म्हणून कार्य व भारताचे विकसीत राष्ट्र म्हणून असलेले व्हिजन, साहित्यसंपदा, वाचनाची आवड याबाबत माहिती दिली. तसेच वाचन प्रेरणा दिनाच्या औचित्यावर मस्वामी विवेकानंद वाचनालय, खरवड येथे विद्यार्थ्यांनी भेट देऊन वाचनालयातील ग्रंथसंपदा तेथील कामकाज समजून घेतले. वाचन संस्कृती रुजावी व मराठी साहित्याचा प्रसार व्हावा म्हणून वासुदेव पाटील यांनी स्वलिखीत बरखा, मल्हार गाठा व काचापाणी ही पुस्तके वाचनालयास भेट दिली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रविंद्र पवार यांनी केले. आभार अमरसिंग तडवी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी वाचनालयाचे अध्यक्ष सुनिल गोसावी, बापू मराठे, दीपक गोसावी ग्रंथपाल स्वामी विवेकानंद वाचनालय, खरवड व प्रतिक्षा ढोडरे हे याप्रसंगी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या सामुदायिक वाचनाचा उपक्रम घेत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.